

आत्मजा ताई

## अध्याम

*तया चक्रवाकांचे मिथुन । सामरस्याचे समाधान ।*
*भोगवी जे चिद्‌गगन- । भुवनदिवा ।।*
*श्रीज्ञानेश्वरी - अ. १६, ओवी ६*

*ग्रंथराज श्रीज्ञानेश्वरीमध्ये ज्ञान, भक्ति, योग यांचा सुरेख संगम आहे, तो नवरसांचा सागर आहे, हा ग्रंथ अनेकविध दृष्टांतातून सिद्धांत उलगडून दाखविण्याची विलक्षण किमया करतो व त्याचा गाभा आत्मज्ञान आहे. अशा ग्रंथराज श्रीज्ञानेश्वरीचे कर्ते, सर्व संतानी ज्यांना गुरुस्थानी मानले ते संतश्रेष्ठ श्रीज्ञानेश्वर महाराज! या श्रीज्ञनेश्वरी ग्रंथाचा ढोबळ मानाने विचार करता त्याचा एक भाग आहे ज्ञान-भक्ति-योगाचा, कर्माचा व विवेक-वैराग्याचा, तर दुसरा भाग आहे केवळ श्रीगुरुभक्तीचा! आत्मज्ञान अनुभवायचे असेल तर एकच साधना, उपासना आहे आणि ती म्हणजे मश्रीगुरुभक्तीफ्‌ म्हणूनच ग्रंथराज श्रीज्ञानेश्वरीतील गुरुभक्ती म्हणजे एक स्वतंत्र गुरुपनिषदच आहे, असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. श्रीमद्‌भगवद्‌गीतेवरील आपल्या श्रीज्ञानेश्वरीरुपी भाष्यात प्रत्येक अध्यायावर प्रवचन करतांना श्रीमाऊली प्रथम गुरुनमन करतात.*

*वरील चित्र हे श्रीज्ञानेश्वरीतील सोळाव्या अध्यायातील सहाव्या ओवीवर आधारलेले आहे. या अध्यायाच्या सुरुवातीला गुरुनमन करताना श्रीमाऊलींनी गुरुंना सूर्याची उपमा दिली आहे. ज्याप्रमाणे भौतिक सूर्य उगवल्यानंतर सर्वांना जड सृष्टीचे भान येते व सृष्टीतील विविध कर्मे सुरु होतात, मनुष्य, पशुपक्षी, सर्वजण आपापल्या कामाला लागतात,*

त्याचप्रमाणे साधकाच्या आध्यात्मिक आयुष्यात जर श्रीगुरुरुपी सूर्य उगवला तर त्याच्या आयुष्यात काय काय बदल होतात (त्या साधकाला श्रीगुरुकृपेमुळे अंतर्सृष्टी, सूक्ष्म सृष्टीचा अनुभव येतो),अशा अर्थाच्या ओव्यांनी सोळाव्या अध्यायाची सुरुवात आहे. तया चक्रवाकाचे मिथुन । सामरस्याचे समाधान । भोगवी जो चिद्गगन-। भुवनदिवा ।। या ओवित ऊल्लेखिलेले चक्रवाक् पक्ष्याचे जोडपे दिवसभर अन्न शोधण्यासाठी बाहेर पडते. सूर्यास्त होताच नर व मादी परत येतात; पण त्यांचे मीलन होत नाही. कारण सूर्य मावळल्यानंतर अंधारात त्यांना दिसत नाही, ते विरहात रात्रभर ओरडत राहतात व सूर्योदयानंतरच त्यांचे मीलन होते. या दृष्टांतातील चक्रवाक् पक्ष्याचे जोडपे म्हणजे जीव आणि परमात्मा किंवा बुद्धी आणि बोध. जीवाचे परमात्म्याशी किंवा बुद्धीचे बोधाशी मीलन होत नाही, कारण मध्ये आहे मी-माझे, अहंकार-ममत्व व षड्विकाररूपी अज्ञानाचा गडद अंधकार. तो दूर होण्यासाठी श्रीगुरुकृपा ज्ञानमार्तंडच प्रगट व्हावा लागतो. केवळ ज्ञानानेच अज्ञानाचा नाश होतो व श्रीगुरु हे तर ज्ञानस्वरुपच आहेत. मनुष्याला तीन प्रकारच्या जाणिवा आहेत, एक आहे सामान्य जाणीव, दुसरी विशेष जाणीव व तीसरी पारमार्थिक जाणीव. मी आहे, ही झाली सामान्य जाणीव, मी स्त्री/पुरुष आहे, मी डॉक्टर आहे, इंजिनिअर आहे, कलाकार आहे, हे माझे नातेवाईक, ही माझी संपत्ती, या माझ्या पदव्या, ही झाली विशेष जाणीव आणि मी आत्मा आहे, ही झाली पारमार्थिक जाणीव. सामान्य व विशेष या भौतिक स्वरुपाच्या जाणिवा प्रत्येकाच्या बुद्धीला आहेतच; पण मी आत्मा आहे ही पारमार्थिक जाणीव-हा बोध सर्वांच्या बुद्धीला होतोच असे नाही, म्हणुन बुद्धी वेगळी व बोध वेगळा. श्रीगुरु आयुष्यात आल्यानंतर ते प्रथम बुद्धीला बोध करतात, तत्वमसि । तू आत्मा आहेस, त्याचा अनुभव घे. मी देह आहे असे मानणारी शिष्याची देहात्मवादी, प्रापंचिक बुद्धी शिवोऽहम । मी शिव आहे, असा अनुभव घेते, ती केवळ श्रीगुरुकृपेनेच! कारण ममी आत्मा आहेफ हा बोध धारण करण्याची क्षमता न मनाची आहे, न इंद्रियांची, ती केवळ बुद्धीची आहे. प्रत्येक योनीतील जीवाला बुद्धी असतेच, फक्त तिची अभिव्यक्ती किंवा तिचे विकसन कमी-अधिक प्रमाणात झालेले असते. मानवात मात्र ती पूर्ण विकसीत आहे. या मानवी देहात येऊन कितीही सत्कर्मे केली तरी बुद्धीला ममी आत्मा आहेफ असा बोध जोपर्यंत होत नाही तोपर्यंत मुक्ती मिळणे अशक्य आहे ( व तो होतो केवळ श्रीगुरुकृपेनेच), असे जग्दगुरु श्रीमद्आद्य शंकराचार्य म्हणतात.

वदन्तु शास्त्राणि यजन्तु देवान् कुर्वन्तु कर्माणि भजन्तु देवताः। आत्मैक्यबोधेन विनापि मुक्तिर्न सिध्यति ब्रम्हशतान्तरेऽपि ।। विवेकचुडामणि, श्लोक ६.

बुध्दीला तरल, विकसित व निष्काम करुन आपल्या आत्मस्वरुपाशी एकरुप करणे हे केवळ श्रीगुरुकृपेनेच शक्य आहे. हा दृष्टांत चित्रित करताना गुरु-उपदेशाप्रमाणे साधना करणारा ध्यानस्थ शिष्य आत्मजाने दाखवला आहे. प्रत्येक क्षणी विवेकाने, योग्ययोग्यतेचा विचार करत, भगवच्चिंतनात एकाग्र राहून तो कर्तव्य करतो, तेव्हा त्याच्या जीवनात गुरुकृपारूपी सूर्य उगवलेला दाखवला आहे. वर असणारा सूर्य इथे खाली दाखविला आहे. कारण कुंडलिनीचे उत्थापन मुलाधार चक्रापासून होते. जे ज्ञान मिळविण्यासाठी शिष्य साधना करतो, गुरुकृपेनंतर त्या ज्ञानाचा तो स्वतः स्वामी होतो. म्हणून खाली उगवलेल्या ज्ञानसूर्याच्या प्रकाशात कुंडलिनीच्या प्रवासाने त्याच्या अंतःकरणात जीव-परमात्मा, बुद्धी-बोध यांचे मीलन झालेले दाखवले आहे आणि तो ज्ञानाचा प्रकाश त्याच्या ब्रम्हरंधातून वर जाऊन आजूबाजूचे अज्ञान अंधकाररूपी आवरण फाडून सर्वत्र प्रसारित झाला आहे. यातून तो शिष्य मिळालेले ज्ञान स्वतःपुरते मर्यादित न ठेवता समाजालाही देतो आहे, असे चित्रकर्त्री आत्मजास दाखवायचे आहे.

आत्मजा ही श्री संत सेवा संघाची समर्पित कार्यकर्ती आहे. संतांचे दिव्य विचार तरुणांपर्यंत पोहोचावेत याकरिता आत्मज्ञान चित्रमालिकेची निर्मिती तिने केली. तत्वज्ञानावर आधारित स्वानुभवाने परिपूर्ण अशी ही चित्रमालिका दर महिन्याला अर्थासहित आपल्या भेटीत येत आहे.